# महाराष्ट्र विधानपरिषद
## दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## मंगळवार, दिनांक १७ जुलै, २०१२
## (सकाळी ११.०० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे.**

**दोन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे :-**

**गृह मंत्री** : "महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्यादित मुंबई, यांचा दिनांक ३१ मार्च, २००९ रोजी समाप्त होणाऱ्या वर्षाचा पस्तीसावा वार्षिक अहवाल" सभागृहाच्या पटलावर ठेवतील.

**तीन : (अ) म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचना - असल्यास.**

**(ब) म.वि.प. नियम ९३ अन्वये निवेदन - असल्यास.**

**चार : लक्षवेधी सूचना- (म.वि.प.नियम १०१ अन्वये) -**

(१) **श्री. मोहन जोशी वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"पुणे शहरातील वाहतुकीचा ताण कमी करण्यासाठी विकास आराखड्यात दाखविण्यात आलेला ४२ कि.मी. लांबीचा रस्ता "एचसीएमटीआर" (हाय कॅपेसिटी मास ट्रॅन्झिट रूट) केवळ जागा ताब्यात घेण्याच्या प्रक्रियेत २५ वर्षे अडकून पडल्याची धक्कादायक बाब नुकतीच निदर्शनास येणे, सदरहू मार्ग सन १९८७ च्या विकास आराखड्यात प्रस्तावित करण्यात आलेला असणे, परंतु रस्त्याची केवळ ३० ते ३५ टक्केच जागा महापालिकेच्या ताब्यात मिळविण्यात यश आलेले असणे, त्यातच १५ टक्के जागेवर अतिक्रमण झालेले असणे, रस्त्याची जागा ताब्यात घेण्यासाठी खाजगी संस्थेची मदत घेण्याचा प्रस्ताव स्थायी समितीने मान्य केलेला असणे, विद्यमान उपमुख्यमंत्र्यांच्या समवेत या विषयावर बैठक होवून रिंगरोड मार्गी लावण्यासाठी ज्याप्रमाणे निर्णय घेण्यात आला त्याचप्रमाणे "एचसीएमटीआर" (हाय कॅपेसिटी मास ट्रॅन्झिट रूट) च्या रस्त्याचे काम मार्गी लावण्याकरिता शासनाने व महानगरपालिका प्रशासनाने जागा ताब्यात देणाऱ्यांना काही सवलत योजना राबवण्याची आवश्यकता, याप्रकरणी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही तथा उपाययोजना."

(२) **श्री.किरण पावसकर, वि.प.स.**पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **गृह मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"मुंबईत महानगरपालिका एम.एम.आर.डी.ए./कलेक्टर ह्या सरकारी खात्याच्या माध्यमातून मोडकळीस आलेल्या व पुनर्विकास करण्यासाठी आवश्यक असलेल्या इमारती रिकाम्या करुन संबंधीत अपघात व भविष्यात होणारी जीवीतहानी टाळण्यासाठी कारवाई केली जाते. सदर कारवाईच्या वेळी कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी आवश्यक पोलीस बंदोबस्त, मुंबई पोलीस आयुक्तांच्या आडमुठ्या धोरणामुळे मिळविणे कठीण झालेले असून, त्यामुळे मुंबई शहरातील मोडकळीस आलेल्या इमारती व धोकादायक इमारतीचा पुनर्विकास थांबलेला असणे, सदर पोलीस बंदोबस्त पोलीस प्रशासनाकडून तातडीने मिळण्यास्तव शासनाने करावयाची कारवाई व उपाययोजना."

(३) **श्री.दिवाकर रावते वि.प.स.**पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **गृह मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"रायगड जिल्ह्यातील (अलिबाग) साळाव येथील रेवंडा खाडीकिनारी असलेल्या वेलस्पन मॅक्स स्टिल या कंपनीने येथील कोळी समाजाची जागा अतिक्रमण करुन बळकावल्याचे नुकतेच उघडकीस येणे, यासंदर्भात स्थानिक पोलिस स्थानकात तक्रार करुनही कोणतीच कार्यवाही होत नसल्याने कोळी समाजाने सदर सुरु असलेल्या बेकायदा बांधकामाची तात्काळ चौकशी करण्याकरिता मा.जिल्हाधिकारी यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केलेली मागणी, सदर प्रकरणी अद्याप कोणतीच कार्यवाही होत नसल्यामुळे कोळी समाजामध्ये पसरलेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, याबाबत शासनाने तात्काळ सखोल चौकशी करुन संबंधित दोषी व्यक्तींवर करावयाची कडक कारवाई, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

(४) **श्री.पांडुरंग फुंडकर, श्रीमती शोभाताई फडणवीस वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **जलसंपदा (कृष्णा खारे-पाटबंधारे महामंडळ वगळून) मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"विदर्भातील सिंचनाचा अनुशेष ११ लाख हेक्टर पर्यंत वाढलेला असून अमरावती विभागातील बुलढाणा जिल्ह्यामध्ये सिंचनाचा अनुशेष २ लाख हेक्टरच्या दरम्यान असणे, बुलढाणा जिल्ह्यात सिंचनाचे क्षेत्र वाढण्याच्या हेतूने सन १९९० मध्ये जिगांव प्रकल्प सुरू करताना त्याची मुळ किंमत ३९४.८३ कोटी रुपये असणे, सन २००९ मध्ये ही किंमत ४०४४ कोटी रुपयांपर्यंत वाढविण्यात येणे, जिगांव प्रकल्पाच्या कामाची मुळ निविदा ३९४.८३

कोटी रुपये असताना ही किंमत जाणिवपूर्वक वाढवून ती ४०४४ कोटी रुपयांपर्यंत नेण्यात येणे, जिगांव प्रकल्पाच्या निविदा ६ गटांमध्ये काढण्यात येऊन त्यासाठी केवळ ९ कंत्राटदारांनीच निविदा भरणे त्यापैंकी ३ कंत्राटदार डमी असल्यामुळे केवळ सहाच कंत्राटदारांना कामे मिळणे, नियमाप्रमाणे ५ टक्क्यापेक्षा जास्त किंमतीच्या निविदा मान्यतेचा अधिकार कार्यकारी संचालकांना नसतांनाही त्यांनी स्वतःच्या अधिकाराचा वापर करुन जास्त दराने निविदा मंजूर करणे, ज्या कंत्राटदारांनी जिगांव प्रकल्पाची कामे केली आहेत त्या कामात अनेक अनियमितता असून त्यात करोडो रुपयांची भ्रष्टाचार होणे, या प्रकरणी शासनाने तातडीने कारवाई करण्याची आवश्यकता व याबाबतची शासनाची भूमिका."

**पाच : विशेष उल्लेख सूचना - असल्यास -**

**<u>दुपारी १.३० ते २.०० वाजेपर्यंत - मध्यंतर</u>**

## (दुपारी २.०० ते सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत)

**सहा : सन २०१२-२०१३ च्या पुरवणी मागण्यांवर चर्चा (दुसरा व शेवटचा दिवस).**

खालील मंत्र्यांच्या मागण्यांवर चर्चा होईल :-

१. मुख्यमंत्री
२. अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री
३. वैद्यकीय शिक्षण आणि फलोत्पादन व मंत्री
४. जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) मंत्री
५. आदिवासी विकास मंत्री
६. उच्च व तंत्र शिक्षण मंत्री
७. शालेय शिक्षण मंत्री
८. वस्त्रोद्योग, अल्पसंख्याक विकास आणि औकाफ मंत्री
९. रोजगार हमी योजना आणि जलसंधारण मंत्री
१०. पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय मंत्री
११. महिला व बालविकास मंत्री
१२. पर्यावरण व सांस्कृतिक कार्य मंत्री

सात : **शासकीय विधेयक :-**

**विधानसभेने समंत केल्याप्रमाणे - विचार, खंडश: विचार व समंत करणे -**

सन २०१२ चे वि.स.वि. क्रमांक १५ - महाराष्ट्र गृहनिर्माण (नियमन व विकास) विधेयक, २०१२.

आठ : **डॉ. सुधीर तांबे,** सर्वश्री. हेमंत टकले, माणिकराव ठाकरे, प्रकाश बिनसाळे, सुभाष चव्हाण, विजयसिंह मोहिते-पाटील, मोहन जोशी, अरुण गुजराथी, सुरेश नवले, दिपकराव साळुंखे, अशोक ऊर्फ भाई जगताप, श्रीमती अलका देसाई, श्री.राजन तेली, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव -**

"रस्ते अपघातांचे दिवसेंदिवस वाढत असलेले चिंताजनक प्रमाण वाढती वाहतूक, अपुरे व अरुंद रस्ते, बेकायदेशीर वाहतूक, बेशिस्त, अप्रशिक्षित व बेजबाबदार वाहनचालक, अकार्यक्षम वाहतूक नियंत्रण व्यवस्था, यासारख्या प्रश्नांमुळे अपघातांमुळे मृत्यू पावणारांची संख्या आज ह्दयरोग व अन्य कुठल्याही आजारांमुळे मृत्यु पावणाऱ्यांपेक्षा खूप अधिक आहे. वाहनांचा वाढलेला वेग, यामुळे अतिशय भीषण अपघात सतत होत असतात. परिणामी मृत्यू वा जीवघेण्या जखमा यांचे प्रमाण खूप अधिक असणे, या गंभीररित्या जखमींवर उपचार करण्यासाठी असलेल्या ट्रॉमा सेंटर्स व ॲम्ब्युलन्स व्यवस्था अपुरी व तोकडी असणे, या अपघातांमध्ये बळी पडणाऱ्यांमध्ये तरुणांची संख्या मोठी असणे, तरुण व्यक्ती बळी पडल्यामुळे कुटुंब निराधार होऊन उध्वस्त होणे, या अपघातात बळी पडलेल्यांना "अपघात विमा" च्या सुविधा योग्यरितीने उपलब्ध नसणे, रस्ते अपघाताचा हा प्रश्न अतिशय महत्वाचा असल्याने यावर त्वरीत उपाययोजना करण्यासाठी तज्ज्ञ व्यक्तींचा समावेश असलेली समिती नेमणे आवश्यक असून या सर्व समस्यांवर तोडगा काढण्यासाठी शासनाने करावयाची ठोस उपाययोजना याबाबत शासनाची प्रतिक्रिया विचारात घेण्यात यावी."

नऊ : **म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा -**

**(अ)** **सर्वश्री.विनोद तावडे,** दिवाकर रावते, पांडुरंग फुंडकर, रामदास कदम, श्रीमती शोभाताई फडणवीस, डॉ.दिपक सावंत, श्री.रामनाथ मोते, डॉ.निलम गोऱ्हे, सर्वश्री.चंद्रकांत पाटील, केशवराव मानकर, सय्यद पाशा पटेल, परशुराम उपकर, डॉ.रणजित पाटील, श्री.गोपीकिशन बाजोरिया, **वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील :- (एक तास)**

"जिल्हा केंद्रीय सहकारी बँकांना बँकीगचा परवाना अत्यावश्यक करण्याचे आदेश मा.सर्वोच्च न्यायालयामार्फत देण्यात येणे व या आदेशान्वये आर.बी.आय.ने ज्या बँकांचे नेट वर्थ किमान १ लाख रुपये असेल अशा बँकांनाच बँकिगचा परवाना देण्यात येण्याबाबत कलम ११ लागू करणे, नागपूर, वर्धा, बुलढाणा, उस्मानाबाद, जालना आणि धुळे-नंदुरबार या सहा

जिल्हा केंद्रिय सहकारी बँकांनी या कलमाचे पालन न केल्याने या बँकांना आरबीआयने कलम ३५ अे लागू केल्यानुसार नवीन ठेवी स्वीकारता न येणे, बँकांमधील आपल्या ठेवी लाखो ठेवीदारांकडून काढून घेण्यात येणे, उपरोक्त ६ जिल्हा केंद्रीय बँकांच्या संचालक मंडळाच्या चुकीच्या कर्जवाटपामुळे व हलगर्जीपणामुळे बँका अडचणीत आल्याने बँकांमार्फत शेतकऱ्यांना पिक कर्जाचे वाटप न होणे, ६ बँकांमार्फत दरवर्षी सुमारे ४,५६१ कोटी रुपयांच्या पिक कर्जाचे वाटप होत असणे, सदरहू वाटप न झाल्याने सुमारे ५.५० लाख शेतकऱ्यांची परिस्थितीत अत्यंत बिकट होणे, राज्यातील पावसाचे लहरीपण पाहता शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट असताना अशा परिस्थितीत कर्जाअभावी शेतकऱ्यांची होणारी कोंडी सोडविण्यासाठी नाबार्डला रि-फायनान्सिंगबाबत हमी देवुन शेतकऱ्यांना लवकरात लवकर कर्ज उपलब्ध करुन देण्याची गरज व जबाबदार संचालक मंडळावर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**(ब) श्री.रामनाथ मोते, वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील :- (तीस मिनिटे)**

"शासनाने राज्यभर सर्व शाळांची पटपडताळणी मोहिम पूर्ण करणे, पटपडताळणीचा अहवाल शासनास प्राप्त होणे, ५० टक्केपेक्षा अधिक अनुपस्थिती असलेल्या शाळांवर व शिक्षकांवर कारवाई करण्याचा निर्णय घेणे, प्रकरण मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाकडे प्रलंबित असणे, न्यायालयाने कारवाईस स्थगिती देणे, शासनाने पुन्हा दिनांक ४ जुलै, २०१२ च्या परिपत्रकानुसार संबंधितांवर कारवाई करण्याचे निर्देश देणे, प्रकरण न्यायप्रविष्ठ असताना स्थगिती आदेश डावलून कारवाईचा निर्णय घेणे, शैक्षणिक वर्ष सुरु होऊनही राज्यात खाजगी शाळांमध्ये शिक्षकांची हजारो पदे रिक्त असणे, शिक्षकांअभावी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणे, भरती प्रक्रियेवर शासनाने बंदी घालणे, शासनाच्या भूमिकेमुळे शिक्षण क्षेत्रात प्रचंड असंतोष निर्माण होणे, शासनाने विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हिताकडे दुर्लक्ष करणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**दहा : अर्धा-तास चर्चा - म.वि.प.नियम ९२ अन्वये- (बैठकीच्या शेवटी)**

**(१) श्री.विक्रम काळे, वि.प.स.**

"ग्रामीण भागातील शाळांमध्ये संगणकाची माहिती देण्यासाठी प्रशिक्षित शिक्षक नेमण्यासाठी करावयाची कार्यवाही" या विषयावरील डॉ.सुधीर तांबे, वि.प.स. यांच्या

तारांकित प्रश्न क्रमांक २८७६४ ला दिनांक १६ एप्रिल, २०१२ रोजी दिलेल्या उत्तरातून उद्भवणाऱ्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

(२) **श्री.सतिश चव्हाण, वि.प.स.**

"जातीचे प्रमाणपत्र प्रत्येक व्यक्तीला स्वतंत्रपणे देण्यापेक्षा एका कुटुंबाला एक प्रमाणपत्र देण्याबाबत" या विषयावरील डॉ.सुधीर तांबे, वि.प.स. यांच्या दिनांक १९ एप्रिल, २०१२ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तराच्या बावीसाव्या यादीतील प्रश्न क्रमांक २५००२ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात उद्भवणाऱ्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : १६ जुलै, २०१२.

**डॉ.अनंत कळसे,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.